महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल: pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP-१६०२४(१३)/३/२०२५-१६/कृ.अ. दि. १६ / ०१ /२०२६

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक,
(छत्रपती संभाजीनगर, अमरावती, लातूर, नागपूर, नाशिक)

**विषय : खोलीकरणासह नवीन सिमेंट नाला बांध बांधणे कामाबाबत..**

**संदर्भ** :- १) जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांकः राकृयो-२०११/प्र.क्र.७२/जल-७, दि.०९.०५.२०१३
२) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचे पत्र जा.क्र. मृदसं/मृद-६/सिनांब/ना.खो./सु.मा.सु/२४०४४/२०२३, दिनांक १९ जुलै, २०२३.
३) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचे पत्र जा.क्र.कृषीआ/मृदसं/मृद-६/ना.खो./शुध्दीपत्रक/ ३४००६/२०२३, दि: २३ ऑक्टोबर, २०२३.

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणाऱ्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ साठी दि. ०८.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता प्राप्त होऊन प्रकल्प अंमलबजावणीस सुरुवात झालेली आहे. सदर प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये सूक्ष्म नियोजन प्रक्रियेद्वारे तयार करण्यात आलेल्या गाव अनुकूल आराखड्यांमध्ये (VAP) पाण्याच्या ताळेबंदावर आधारित प्रस्तावित केलेले मृद व जलसंधारण कामे राबविणे प्रस्तावित आहे.

प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये सूक्ष्म नियोजन प्रक्रियेद्वारे क्षेत्रीय स्तरावर गाव अनुकूलन आराखडे तयार करताना सिमेंट नाला बांध (सिनाबा) बांधणे हे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. सदर आराखड्यांना तांत्रिक पडताळणी अंती जिल्हास्तरावरून मंजुरी देण्यात देण्याची कार्यवाही सुरु आहे. संदर्भ क्र. १ चा शासन निर्णय आणि संदर्भ क्र. २ व ३ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार खोलीकरणासह नवीन सिमेंट नाला बांध बांधणे या कामास मान्यता देण्यात आलेली असून याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने प्रकल्पामध्ये देखील सदर बाबीचा समावेश करण्यात येत असून गाव अनुकूलन आराखड्यामध्ये ज्या ठिकाणी सिमेंट नाला बांध (सिनाबा) बांधणे हे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहेत व आराखड्यांना जिल्हा स्तरीय समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे, अश्या ठिकाणी तांत्रिक पडताळणीअंती खोलीकरणासह नवीन सिमेंट नाला बांध बांधणे हा घटक आवश्यकतेनुसार राबविण्यात यावा. सदर बाबीसाठी वरील सूचनांनुसार अंदाजपत्रक तयार करून NRM पोर्टल वर पुढील कार्यवाही करण्यात यावी. सदरील बाबीसाठी संदर्भ क्र. १ चा शासन निर्णय व कृषि आयुक्तालय मार्फत निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

Parimal 16/1

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

**प्रत**:- संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहितीस्तव.